**राज्यात सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-१ (प्रथम कळ) व Trigger-२ (दुसरी कळ) लागू झालेल्या ३०४ तालुक्यांमध्ये मृद व जलसंधारणाची कामे करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## मृद व जलसंधारण विभाग

**निर्णय क्रमांक जशिअ २०२६/प्र.क्र.५३/ई-ऑफीस क्र. १६४६४६२/जल-७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक: २६ ऑक्टोबर, २०२६**

**<u>वाचा :-</u>**

१. मदत व पुनर्वसन विभाग, शासन निर्णय क्र.समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. २५.०९.२०२६.
२. मदत व पुनर्वसन विभाग, शासन निर्णय क्र.समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. १४.१०.२०२६.
३. मा. मंत्रिमंडळ उप समितीचे दि. २९.०९.२०२६ रोजीच्या बैठकिचे इतिवृत्त.

**<u>प्रस्तावना:-</u>**

राज्यात संभाव्य अल- निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारण कामांच्या समन्वयासाठी शासन निर्णय दि.०८.०५.२०२६ अन्वये मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कृती दल (Task Force) गठित करण्यात आलेला असून सदर कृती दलाच्या दि.२०.०५.२०२६ आणि दि. २२.०७.२०२६ रोजी बैठक पार पडली असून त्यांचे इतिवृत्त देखील निर्गमित करण्यात आलेले आहे.

२. मदत व पुनर्वसन विभागाने सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-१ (प्रथम कळ) व Trigger-२ (दुसरी कळ( लागू झालेल्या ३०४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याबाबत संदर्भाधिन शासन निर्णयांन्वये निर्णय घेतला आहे. सदर शासन निर्णयांनूसार जाहिर केलेल्या उपाययोजनांमध्ये **“जलसंधारणाची कामे सुरु करणे”** या उपाययोजनांचा समावेश आहे.

३. राज्यात **"सेवा संकल्प अभियान"** आणि **"जलसंधारण अभियान"** कालावधीत **दशसूत्री** कार्यक्रम राबविणेबाबत शासन पत्र, दि. १५.०९.२०२६ अन्वये सर्व जिल्हाधिकारी यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदर **दशसूत्री** कार्यक्रम मृद व जलसंधारण कामांशी निगडित आहे.

४. राज्यात अपु-या पावसामुळे उध्दवलेल्या दुष्काळजन्य परिस्थितीचा आढावा घेवून उपाययोजना सुचवण्यासाठी शासन निर्णय, दि. २२.०९.२०२६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या मा.मंत्रीमंडळ उपसमितीची बैठक दि.२९.०९.२०२६ रोजी मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली असून सदर बैठकित दुष्काळ जाहीर केलेल्या तालुक्यांमध्ये विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याबाबत संबंधित

प्रशासकीय विभागाने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर निर्देशास अनुसरून राज्यात Trigger-१ (प्रथम कळ) व Trigger-२ (दुसरी कळ( लागू झालेल्या ३०४ तालुक्यांमध्ये मृद व जलसंधारणाची कामे करणेबाबत विभागाच्या क्षेत्रिय यंत्रणांना सुचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्यात Trigger-१ (प्रथम कळ) व Trigger-२ (दुसरी कळ) लागू झालेल्या ३०४ तालुक्यांमध्ये खालील नमूद केलेली मृद व जलसंधारणाची कामे हाती घेण्यात यावीत.

१) मृद व जलसंधारण विभागाच्या अखत्यारितील **योजनांतर्गत प्रगती पथावरील / अपूर्ण कामे** पूर्ण करणे.

२) मृद व जलसंधारणाच्या संरचनांच्या **दुरुस्तीची कामे** करणे.

३) दुष्काळ घोषित केलेल्या ३०४ तालुक्यातील प्रत्येक गावांमध्ये किमान १०० **जलशोषक खड्डे** तयार करण्यात यावेत.

४) सर्व बंधा-यांवर **गेट/फळ्या बसवून** पाणी अडविण्यात यावे. याची मोका पाहणी वेळोवेळी करण्यात यावी.

५) **नादुरुस्त को.प. बंधारा यांची दुरुस्ती करून नीडल** बसविण्यात यावेत.

६) दुष्काळ घोषित केलेल्या ३०४ तालुक्यातील गावांतील **जलसाठ्यांमधील गाळ** काढणे.

७) दुष्काळ घोषित केलेल्या ३०४ तालुक्यातील गावांतील **नाल्यांचे खोलिकरण व रुंदिकरण** करणे.

८) जिल्ह्यात **वनराई बंधारे** तयार करण्यात यावे.

९) नाला खोलिकरणाच्या जागी, बंधा-यामध्ये, तलावांमध्ये **रिचार्ज शाफ्ट** घेणे.

१०) शासकिय व खाजगी इमारतींवर **Rainwater Harvesting** संरचना बनविणे.

११) स्वयंसेवी संस्थांच्या (उदा. पाणी फॉडेशन, नाम फॉडेशन, टाटा ट्रस्टस, चंद्रा फॉडेशन व अन्य संस्था) माध्यमातून करण्यात येणा-या मृद व जलसंधारणाच्या कामांची प्रभावी अंमलबजावणी करणे.

२. उक्त नमूद कामे खालील नमूद निधीस्त्रोतातून करण्यात यावीत.

a) जलयुक्त शिवार अभियान २.० व प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० ह्या योजनांमधील समाविष्ट गावांमध्ये संबंधित योजनेचा निधी,

b) जिल्हा नियोजन निधी (DPC)/ विशेष घटक योजना/ अनुसूचित जाती उपयोजना/ अनुसूचित जमाती उपयोजना/ अनुसूचित क्षेत्राबाहेरील उपयोजना/तांडा विकास योजना/नाविन्यपूर्ण योजना/ जन सुविधांसाठी विशेष अनुदान.

c) खनिज विकास निधी (MNF)

d) खासदार निधी (MP Fund), आमदार निधी ( MLA Fund / MLC Fund)

e) Corporate Social Responcibility (CSR)

f) रोहयो / VB G RAM G यांचा निधी

g) अन्य उपलब्ध शासन निधी स्त्रोत

३. उक्त नमूद केलेली कामे करतांना विभागाच्या **क्षेत्रिय यंत्रणांनी खालील मार्गदर्शक सुचनांचे पालन करावे.**

a) परि.१ मधील तक्त्यात नमूद केलेली दुरुस्तीची कामे हाती घेतांना, **जलदर्पण ॲपवर** दुरुस्तीची आवश्यकता असलेल्या संरचनांची अदयावत केलेल्या माहितीची पडताळणी करुन सदर कामांना प्राधान्य देण्यात यावे.

b) सदर दुरुस्ती करावयाच्या कामांची किंमत प्रचलीत आर्थिक मापदंडाच्या २० टक्के मर्यादेत व रु. २५.०० लक्षपेक्षा कमी असल्यास संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मंजुरी देण्यासाठी सक्षम अधिकारी असतील.

c) परि.१ मधील तक्त्यात नमूद केलेली कामे करण्यासाठी प्राधान्याने **VB G RAM G/ रोहयो** या योजनेच्या निधीतून मृद व जलसंधारणाची जास्तीत जास्त कामे हाती घ्यावित.

d) परि.१ मधील तक्त्यात नमूद केलेली कामे करतांना प्रचलित शासन निर्णय, शासन परिपत्रके, वित्तिय नियम, तांत्रिक मापदंड यांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

e) तसेच, परि.१ मधील तक्त्यात नमूद केलेली सर्व कामांची जिओ-टॅगिंग करून संबंधित योजनांच्या पोर्टलवर अद्यावत करण्याची दक्षता घ्यावी.

f) राज्यात चालू वर्षी दुष्काळाच्या पार्श्वभुमीवर स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून (उदा. पाणी फॉडेशन, नाम फॉडेशन, टाटा ट्रस्टस, चंद्रा फॉडेशन व अन्य संस्था) करण्यात येणा-या मृद व जलसंधारणाच्या कामांची प्रभावी अंमलबजावणी करणे.

g) परि.१ मधील तक्त्यात नमूद केलेल्या सर्व कामांचा गोषवारा संबंधीत जिल्ह्याच्या कार्यकारी अभियंता (शासन स्तर/जिल्हा परिषद) यांनी अधिक्षक अभियंता यांचेमार्फत दर १५ दिवसांनी शासनास सादर

करावा. उक्तप्रमाणे शासनास माहिती सादर केलेबाबत संबंधीत मुख्य अभियंता यांनी संनियंत्रण करावे.

h) राज्यात चालू वर्षी दुष्काळाच्या पार्श्वभुमीवर करण्यात येणा-या उपाययोजनांबाबत राज्य शासनाच्या अन्य विभागांकडून वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे/मार्गदर्शक सुचनांचे पालन करण्यात यावे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१०२६१४३७४७०७२६ असा आहे हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DEVENDRA PANDIT BHAMARE

Digitally signed by DEVENDRA PANDIT BHAMARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Soil and Water Conservation, 2.5.4.20=7FC8A7EEFE50AB61E540936829D8614649D6FEBF79C1E2BABDE15C7569EB880F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=716799EF27C5A6E36AAC6120CFC6E56F4D9991CEA2DBBD722FBFCA28C368854C, cn=DEVENDRA PANDIT BHAMARE
Date: 2026.10.26 14:39:18 +05'30'

**(देवेंद्र भामरे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. सभापती, विधान परिषद यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा. अध्यक्ष, विधान सभा यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद व विधान भवन, मुंबई
७. सर्व मा. विधान परिषद / विधान सभा सदस्य, विधान भवन, मुंबई
८. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. आयुक्त, रोहयो, नागपुर्म,
११. आयुक्त, मृद व जलसंधारण, छत्रपती संभाजीनगर
१२. सर्व विभागीय आयुक्त,
१३. सर्व जिल्हाधिकारी,
१४.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१५.सर्व मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण विभाग,
१६. सर्व अधिक्षक अभियंता, मृद व जलसंधारण विभाग,
१७.सर्व कार्यकारी अभियंता, मृद व जलसंधारण विभाग,
१८.सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
१९. निवडनस्ती कार्यासन जल-७.